राज्यात औद्योगिक पायाभूत सुविधांची निर्मिती
व विकास या योजनेअंतर्गत प्राप्त प्रस्तावाला
प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.
पनवेल सहकारी औद्योगिक वसाहत मर्या,
पनवेल, जि.रायगड (सन २०२२-२३)

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,**
**शासन निर्णय क्र.औपासू- २०२४/ प्र.क्र.०६/ उद्योग-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २५ जानेवारी, २०२४

वाचा :- १) शासन निर्णय क्र. आयआयआय पॉलिसी २०१०/प्र.क्र.७६८/उद्योग-२, दिनांक २२/०२/२०१३.
२) शासन निर्णय क्र.औपासू २०१२/प्र.क्र.२३४/उद्योग-२, दिनांक २५/०२/२०१४.
३) शासन शुध्दीपत्रक क्र.औपासू-२०१६/प्र.क्र.२१९/उद्योग-२, दिनांक २०/१२/२०१६.
४) सुकाणू समितीच्या नवव्या बैठकीचे इतिवृत्त दिनांक ०३/०२/२०२३
५) शासन निर्णय क्र. औपासू-२०२२/प्र.क्र.११५/उद्योग-२,दिनांक ०९/०२/२०२३
६) अतिरिक्त उद्योग संचालक, उद्योग संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. उसं/ साप्रोयो/पायाभुत सुविधा/पनवेल सऔव/२०२२-२३/२०२४/ अे-४२, दिनांक १६/०१/२०२४

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र औद्योगिक पायाभूत सुविधा निर्मिती व विकास या योजनेअंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेण्यासाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समितीची ९ वी बैठक दिनांक ०३/०२/२०२३ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये समितीने एकूण १० सहकारी औद्योगिक वसाहतीच्या पायाभूत सुविधांच्या कामांकरीता निधी मंजूर केला आहे. त्यापैकी, पनवेल सहकारी औद्योगिक वसाहत मर्यादित, पनवेल, जि. रायगड या संस्थेच्या पायाभूत सुविधांच्या कामाकरीता समितीने रुपये २२,३१,५१,५०० /- इतका निधी मंजूर केला आहे. सदर संस्थेने त्यांच्या हिश्याची २५ टक्के रक्कम (रु. ५,५७,८७,८७५/-) कार्यान्वयन यंत्रणा (महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ) कडे जमा केली आहे. सबब, सदर संस्थेच्या कामाकरीता प्रशासकीय मंजूरी देण्याबाबतचा प्रस्ताव उद्योग संचालनालयाने त्यांच्या दिनांक १६/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावाची तपासणी करण्यात आली असून, प्रस्तुत संस्थेच्या रुपये २२,३१,५१,५००/- एवढया रकमेच्या कामांकरीता प्रशासकीय मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

औद्योगिक पायाभूत सुविधा निर्मिती व विकास या योजनेअंतर्गत सुकाणू समितीने निधी वितरणास मान्यता दिलेल्या पनवेल सहकारी औद्योगिक वसाहत मर्यादित,पनवेल,जि.रायगड या संस्थेच्या पायाभूत सुविधांच्या कामाकरीता एकूण रुपये २२,३१,५१,५०० /- इतक्या रकमेच्या कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सादर केले आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ. क्र | औद्योगिक वसाहत/ समुह | पायाभूत सुविधा तपशील व कार्यान्वयन यंत्रणा | कार्यान्वयन यंत्रणाने दिलेल्या तांत्रिक मान्यतेची रक्कम (रुपये) | सुकाणू समितीने मान्यता दिल्यानुसार पायाभूत निधीतून द्यावयाची रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | पनवेल सहकारी औद्योगिक वसाहत मर्यादित, पनवेल,कॉमन ॲमिनिटी बिल्डींग, ओल्ड मुंबई पुणे हायवे, ता.पनवेल, जि.रायगड | १)Road Portion<br>Rs ६,३६,३७,३२०.००<br>२)Road Furniture -<br>Rs. ६,५८,२५०.००<br>३)Gutter & footpath-<br>Rs.५,८३,७४,४१७.००<br>**Total Cost - Rs.१२,२६,६९,९८७.००**<br>४) १८%GST-<br>Rs. २,७०,८०,५९७.००<br>**Total Cost -**<br>**Rs.१४,४७,५०,५८४.६६**<br>५) ५% contingencies -<br>Rs ७२,३७,५२९.२३<br>६) १०% Escalation -<br>Rs १,४४,७५,०५८.४७<br>७)१.५ % consultancy -<br>Rs २१,७१,२५८.७७<br>**Total Cost - Rs. १६,८६,३४,४३१.१२**<br>**Say-**<br>**Rs. १६,८६,३४,५००.००**<br>८). ५% ETP -<br>Rs ८४,३१,७२५.००<br>**Total Cost -**<br>**Rs १७,७०,६६,३००.००** | २२,३१,५१,५०० | १६,७३,६३,६२५ (७५ टक्के) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | २)Domestic Drainage Network<br>१) HDPE pipes & RCC -<br>Rs<br>२,०५,२५,४९६.००<br>२) १८% GST -<br>Rs ३६,९४,५८९.२८<br>**Total Cost -**<br>**Rs २,४२,२०,०८५.२८**<br>३) ५% contingencies -<br>Rs १२,११,००४.२६<br>४) १०% Escalation -<br>Rs २४,२२,००८.५३<br>५) १.५ % consultancy Charges<br>Rs ३,६३,३०१.२८<br>**Total Cost-**<br>**Rs. २,८२,१६,३९९.२५**<br>**Say-**<br>**Rs.२,८२,१६,४००.००**<br>६) ५% ETP -<br>Rs १४,१०,८२०.००<br>**Total Cost -**<br>**Rs २,९६,२७,२२०.००**<br>**Say-**<br>**Rs २,९६,२७,३००.००**<br><br>**३) Water supply network & sump,ESR**<br>१) pipline -<br>Rs ६३,३४,०११.००<br>२) Construction of sum & ESR -<br>Rs ५०,६७,८००.००<br>**Total Cost-**<br>**Rs. १,१४,०१,८११.००**<br>३) १८% GST -<br>Rs २०,५२,३२५.९८ | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | Total Cost -<br>Rs १,३४,५४,१३६.९८<br>४) ५% contingencies -<br>Rs ६,७२,७०६.८५<br>५) १०% Escalation -<br>Rs १३,४५,४१३.७०<br>६)१.५%consultancy charges -<br>Rs २,०१,८१२.०५<br>Total Cost-<br>Rs.१,५६,७४,०६९.५८<br>Say-<br>Rs.१,५६,७४,१००.००<br>७) ५% ETP -<br>Rs ७,८३,७०५.००<br>Total Cost -<br>Rs १,६४,५७,८०५.००<br>Say-<br>Rs.१,६४,५७,९००.००<br>Total Cost-<br>RS २१,२५,२५,०००.००<br><br>Rs.२२,३१,५१,५००.०० | | |
| **कार्यान्वयन यंत्रणा : -(MIDC)** | | | | |

२. सदर संस्थेच्या प्रकल्पाचे नकाशे व अंदाजपत्रकाची कार्यान्वयन यंत्रणा म्हणून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने तपासणी केली असून, त्यास तांत्रिक मान्यता दिली आहे. पनवेल सहकारी औद्योगिक वसाहत मर्यादित,पनवेल, जि.रायगड यांनी त्यांच्या हिस्स्याची २५ टक्के रक्कम कार्यान्वयन यंत्रणेकडे जमा करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र, देखभाल दुरुस्तीबाबतचे हमीपत्र तसेच रस्ता सामान्य जनतेसाठी खुला करण्यात येईल याबाबतच्या हमीपत्राचा करारनामा देखील उद्योग संचालनालयाशी दिनांक ०६/०१/२०२४ रोजी केला आहे. संस्थेमार्फत या योजनेअंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत ज्या अटी व शर्ती आहेत त्याची पूर्तता होत असल्याने, संस्थेच्या कामांकरीता एकूण रुपये २२,३१,५१,५०० /- (रुपये बावीस कोटी एकतीस लाख एकावन्न हजार पाचशे फक्त) इतक्या खर्चाचे नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. प्रकल्प किंमतीमध्ये झालेली वाढ संस्थेस अनुज्ञेय राहणार नाही. वाढीव खर्च संस्थेमार्फत करण्यात यावा.

४. सदर प्रशासकीय मान्यता ही सुकाणू समितीच्या दिनांक ०३/०२/२०२३ रोजी झालेली नवव्या बैठकीमध्ये समितीने दिलेल्या मान्यतेनुसार तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.औपासू-

२०१२/ प्र.क्र.२३४/ उद्योग-२, दि.२५/०२/२०१४ मधील परि. ६ नुसार देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन देण्यात येत आहे.

५. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०२४०१२५१११४९४९२८१० असा आहे. हे शासन ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SANJAY SHAMKANT DEGAONKAR

Digitally signed by SANJAY SHAMKANT DEGAONKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=de0a2ca7914a3c02f24aa23655f609f41f2d36b0ec57da4c71f19aaf08230a79, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=56CF8C8577584ADC42F070185C585C41084CC34F6683553D21CCACBFA33D4D1F, cn=SANJAY SHAMKANT DEGAONKAR
Date: 2024.01.25 15:38:53 +05'30'

**( संजय देगांवकर )**
**सह सचिव (उद्योग), महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) महालेखापाल, महाराष्ट्र-१(लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षण), मुंबई.
२) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षण), नागपूर.
३) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
४) निवासी लेखा परीक्षण अधिकारी, मुंबई.
५) विकास आयुक्त(उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई-४०० ०३२.
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
७) मुख्य अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
८) पनवेल सहकारी औद्योगिक वसाहत मर्यादित,पनवेल,जि.रायगड
९) मुख्य लेखाधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
१०) वित्त विभाग (कार्यासन अर्थसंकल्प-१४/ व्यय-१६), मंत्रालय, मुंबई.
११) अवर सचिव (प्रशासन-१), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) निवडनस्ती (उद्योग-२)